# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 22/12/2017 रोजी (का.प.क्र.15) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

शुक्रवार दिनांक 22 डिसेंबर 2017 रोजी (का.प.क्र.15) मा.सभापती श्री.गजानन रामकिसन बारवाल यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11-40 वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली.सभेला मा.अतिरिक्त आयुक्त श्री.श्रीकृष्ण भालसिंग, नगरसचिव व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य
02. स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे
03. स.स.श्री.सिताराम इसराम सुरे
04. स.स.श्री.अजिम अहेमद रफिक
05. स.स.श्री.ऋषिकेश चंद्रकांत खैरे
06. स.स.सिध्दांत संजय शिरसाट
07. स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे
08. स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले
09. स.स.श्री.सोहेल शकिल शेख
10. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
11. स.स.श्रीमती मनिषा बालाजी मुंडे
12. स.स.श्री.सय्यद मतीन रशिद
13. स.स.श्रीमती शेख नरगीस सलिम
14. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
15. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे

**विषय क्र. 179 : (नगर सचिव विभाग)**

दिनांक 02/08/2017 (का.प.क्र.05), दि.10/08/2017 (का.प.क्र.06), दि.23/08/2017 (का.प.क्र.07), दि.13/09/2017 (का.प.क्र.08), दि.28/09/2017 (का.प.क्र.09), दि.04/10/2017 (का.प.क्र.10) व दि.11/10/2017 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

दिनांक 02/08/2017 (का.प.क्र.05), दि.10/08/2017 (का.प.क्र.06), दि.23/08/2017 (का.प.क्र.07), दि.13/09/2017 (का.प.क्र.08), दि.28/09/2017 (का.प.क्र.09), दि.04/10/2017 (का.प.क्र.10) व दि.11/10/2017 (का.प.क्र.11) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.

**विषय क्र. 180 : (अतिरिक्त आयुक्त)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वज्ञ एजन्सीज, औरंगाबाद यांनी मजुर पुरवठा करण्याचे काम हे इतर एजन्सीला दिलेल्या दरानुसार करण्यास तयार असल्याने त्यांना मजुर पुरवठा करण्यासाठी संधी देण्याची विनंती केली आहे. सर्वज्ञ एजन्सीकडे कामगार आयुक्त, औरंगाबाद यांचेद्वारा 50 मजुर पुरवठा करण्यासाठीचा परवाना क्र.1741500110021971 दि.09/11/2017 मिळाला असून सदर लायसन्सची अनुज्ञेयता दि.31/12/2018 अशी आहे.

कामगार विभाग, महानगरपालिका औरंगाबाद यांनी कार्यालयीन आदेश क्र.मनपा/कावि/263/2017 दि.19/09/2017 नुसार व्यवस्थापक, जय बजरंग सर्व्हीसेस, औरंगाबाद यांना 11 महिन्यांसाठी रू.13950/- प्रति मजुर खाजगी तत्वावर पुरवठा करण्यासाठी आदेशित केलेले आहे. मा.महापौर यांनी शहरामध्ये Night Sweeping सुरू करावी, असे निर्देश दिलेले आहेत, तसेच स्वच्छ सर्वेक्षण-2018 मध्ये Night Sweeping साठी गुणांकन आहे. त्यासाठी खाजगी मजुर लागणार आहेत.

सर्वज्ञ एजन्सीज यांचेकडून पन्नास (50) सफाई मजुर Night Sweeping साठी मा.स्थायी समितीची मान्यता घेवुन पुरवठा आदेश देण्याच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांची मान्यता मिळाली आहे.

करिता सर्वज्ञ एजन्सीज, पुंडलीकनगर औरंगाबाद यांचेकडून 50 (पन्नास) सफाई मजूर प्रति मजुर रू.13950/- (रू.तेरा हजार नऊशे पन्नास) प्रतिमाह या दराने (जय बजरंग सर्व्हीसेस यांना लागू असलेल्या अटी/शर्ती प्रमाणेच) पुढील अकरा महिन्यासाठी घेण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 5(2) (2) आधारे मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : एम.आय.एम. पक्षाच्या स्थायी समिती सदस्यांचा विरोध नोंदवून विषय मंजुर करण्यांत येतो. तसेच संबंधीत विभागाने या एजन्सीकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी. तसेच आणखी मजुरांची आवश्यकता असल्याने ज्या एजन्सीला काम दिले, परंतु वर्कऑर्डर दिलेली नाही, त्यांना वर्कऑर्डर देऊन त्यांचेकडून जास्तीचे सफाई मजूर कर्मचारी उपलब्ध करून घ्यावे. तसेच कब्रस्तान मध्ये सुरक्षा रक्षक किंवा सेवक कर्मचारी उपलब्ध करून द्यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.महापौर यांनी शहरामध्ये Night Sweeping सुरू करावी, असे निर्देश दिलेले असल्याने तसेच स्वच्छ सर्वेक्षण-2018 मध्ये Night Sweeping साठी गुणांकन असल्याने, त्यासाठी खाजगी मजुर लागणार असल्यामुळे, सर्वज्ञ एजन्सीज, पुंडलीकनगर औरंगाबाद यांचेकडून 50 (पन्नास) सफाई मजूर प्रति मजुर रू.13950/- (रू.तेरा हजार नऊशे पन्नास) प्रतिमाह या दराने (जय बजरंग सर्व्हीसेस यांना लागू असलेल्या अटी/शर्ती प्रमाणेच) पुढील अकरा महिन्यासाठी घेण्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील प्रकरण 5(2) (2) नुसार मान्यता देण्यांत येते, तसेच संबंधीत विभागाने या एजन्सीकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून घ्यावी यासह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 181 : (कार्यकारी अभियंता 4 ते 7 व 9)**

विषय : वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत पटेलनगर, अजीजनगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेलनगर व कलावतीनगर येथे 300 मी.मी. व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकणे. या कामाचे ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच टेंडर र.रू.9417339/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र./Tender -ID-2017-AMCA-225701-8

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | उपअभियंता झोन क्र.05, सिडको |
| 2. | कामाचे स्वरुप | वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत पटेलनगर, अजीजनगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेलनगर व कलावतीनगर येथे 300 मी.मी. व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | मा.सर्वसाधारण सभा दि.20/04/2017 विषय क्र.965 अं.प.र.रू.98,89,195/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | र.रू. 98,89,195/- |

| | | |
|---|---|---|
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | 1. दैनिक प्रसार, दि.29/06/2017 |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | 06 सप्टेंबर 2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 25 सप्टेंबर 2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | तीन (03) |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.सहारा कन्स्ट्रक्शन | र.रू.9417339/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 0.01% कमी दराने |
| 2 | मे.मेगा बिल्डर | र.रू.9607589/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 2.01% जास्त दराने |
| 3 | श्री.मनोहर ढोबळे | र.रू.9785594/- | अंदाजपत्रकीय दरापेक्षा 3.90% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मुलभुत सोई सुविधांचा विकास योजने अंतर्गत |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | नाही |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषपत्राचा नमुना जोडला आहे काय? | आहे |

विषयांकित कामासाठी ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांनी 0.01% कमी दराने निविदा दाखल केली आहे. त्यानुसार ठेकेदार मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच रक्कम रू.94,17,339/- पर्यंत करून घेणेस आणि स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.35 नारेगाव अंतर्गत पटेलनगर, अजीजनगर, जोशी गल्ली येथे कॉंक्रीट रस्ता तयार करणे तसेच पटेलनगर व कलावतीनगर येथे 300 मी.मी. व्यासाची SWG ड्रेनेज लाईन टाकणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सहारा कन्स्ट्रक्शन यांचेकडून 0.01% कमी दराने म्हणजेच रक्कम रू.94,17,339/- पर्यंत करून घेणेस आणि स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 182 : (मालमत्ता विभाग)**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे पैठणगेट येथील आर.सी.सी. कॉलममध्ये अर्धवट बांधकाम असलेली जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी श्री.महर्षी वाल्मिकी युवा विकास मंडळ, संचालिका यांनी मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर अर्धवट असलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ 630 चौ.मी. (त.म. व प.म.) ऐवढे असून सन 2017 च्या सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे प्रतीमाह भाडे रक्कम रू.41,396/- ऐवढे होते.

तसेच सदरची अर्धवट असलेली इमारतीची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत संस्थेने स्वखर्चाने करावयाच्या आहेत. महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणेचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : विद्युत देयकावरील खर्च, जागेचे मेंटेंनन्स खर्च या बाबींवर संबंधीत संस्थेचा खर्च मोठ्या प्रमाणावर होणार आहे, त्यामुळे आकारण्यात आलेले भाड्या ऐवजी रू.21000/- प्रतीमाह करण्यांत येते तसेच संबंधीतास दुरूस्तीपोटी व लाईट बीलापोटी येणारा खर्च लक्षात घेता किमान 5 वर्ष भाडेतत्वावर देण्यांत येते व संस्थेने या कालावधीत नियमीत भाडे भरणा केल्यास पुनश्चः पूढील 5 वर्ष मुदतीसाठी 10% नैसर्गिक वाढ करून भाडेतत्वावर देणेस मंजुरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे पैठणगेट येथील आर.सी.सी. कॉलममध्ये अर्धवट बांधकाम असलेली जागा सदर अर्धवट असलेल्या इमारतीचे क्षेत्रफळ 630 चौ.मी. (त.म. व प.म.) जागा संचालिका,श्री.महर्षी वाल्मिकी युवा विकास मंडळ, यांना भाडेतत्वावर देणेस व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार विद्युत देयकावरील खर्च, जागेचे मेंटेंनन्स खर्च या बाबींवर संबंधीत संस्थेचा खर्च मोठ्या प्रमाणावर होणार असल्याने, आकारण्यात आलेल्या रक्कम रू.41,396/- भाडे याऐवजी रू.21000/- (रू.एकवीस हजार फक्त) प्रतीमाह भाडे आकारण्यांत येते तसेच संबंधीतास दुरूस्तीपोटी व लाईट बीलापोटी येणारा खर्च लक्षात घेता किमान 5 वर्ष भाडेतत्वावर देण्यांत येते व संस्थेने या कालावधीत नियमीत भाडे भरणा केल्यास पुनश्चः पूढील 5 वर्ष मुदतीसाठी 10% नैसर्गिक वाढ करून भाडेतत्वावर देणेस मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

**विषय क्र. 183 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत व्यायामशाळा बांधणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुची सन 2015-2016 नुसार रक्कम रू.48,75,352/- चे तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास दि.01/10/2017 अन्वये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

तसेच सदर कामासाठी लागणारा खर्च महानगरपालिका अर्थसंकल्प 2017-2018 मधील लेखाशिर्ष विकास इमारती, शाळा व दवाखाने अंतर्गत पृष्ठ क्र.GBR-Ward-8-P.No.65 वर Sr.No.4 वर तरतुद उपलब्ध आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.48,75,352/- मंजुरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव तथा विचारार्थ सादर.

मा.सभापती : ऐनवेळचे विषय क्र.183 ते विषय क्र.186 मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.110 मयुरबन कॉलनी अंतर्गत व्यायामशाळा बांधणे या कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रू.48,75,352/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 184 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मौजे गारखेडा परिसरातील विद्यानगर, अलंकार को.-ऑप. हौ.सो. मधील रेखाकंनातील खुल्या जागेमधील ऑफ शेडची जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी श्रीमती तब्बसुम हुसेन जमादार, रा.गारखेडा परिसर, गजानन कॉलनी यांनी उदरनिर्वाहसाठी जागा भाडेतत्वावर मिळणेसाठी मागणी केलेली आहे. त्यानुसार सदर ऑफ शेडची असलेली जागा ज्याचे क्षेत्रफळ 52.05 चौ.मी. एवढी असून सन 2017 च्या सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे प्रतीमाह भाडे रक्कम रू.4463/- एवढे होते.

तसेच सदरची ऑफ शेडच्या जागेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत अर्जदाराने स्वखर्चाने करावयाच्या आहेत. महानगरपालिकेस वार्षिक भाडे व इतर कर भरणा करणे इत्यादीच्या अटीस अधीन राहून 11 महिनेसाठी भाडेतत्वावर देणेसाठीचा प्रस्ताव मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकीचे मौजे गारखेडा परिसरातील विद्यानगर, अलंकार को.-ऑप. हौ.सो. मधील रेखाकंनातील खुल्या जागेमधील ऑफ शेडची असलेली जागा ज्याचे क्षेत्रफळ 52.05 चौ.मी. श्रीमती तब्बसुम हुसेन जमादार, रा.गारखेडा परिसर, गजानन कॉलनी यांना उदरनिर्वाहसाठी भाडेतत्वावर देणेस तसेच सन 2017 च्या सिध्द शिघ्र गणकाप्रमाणे आकारण्यात आलेले प्रतीमाह भाडे रक्कम रू.4463/- याऐवजी र.रू.1000/- प्रतीमाह भाडे प्रमाणे देणेस तसेच सदरची ऑफ शेडच्या जागेची देखभाल दुरूस्ती, विद्युत देयक, पाणीपट्टी, मालमत्ता कर, सेवा कर इत्यादी सर्व बाबी संबंधीत अर्जदाराने स्वखर्चाने करणेस व महानगरपालिकेस वार्षिक भाडे, इतर कर भरणा करणे इत्यादीच्या अटीस अधीन राहून 11 महिने ऐवजी 5 वर्षासाठी भाडेतत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 185 :**

विषय : वार्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत विजयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिन्टन हॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.33,80,800/- या रक्कमेस मान्यता घेणे बाबत तसेच सदर कामाचे ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.2017-AMCA-244971-2 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-1 कार्यालय. |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत विजयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिंटन हॉल बांधणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 33,80,800/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 32,19,785/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत (एकूण 4 वेळा) (4 वेळा मुदतवाढ) | 21/09/2017 ते 13/10/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 17/10/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेकेदाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट | 3219785.00 | 10.00 टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मंजुर रेखाकंनातील विकास कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयांकित प्रकरणी ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत विजयनगर येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिन्टन हॉल बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 186 :**

विषय : वार्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत चैतन्य हौसींग सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिन्टन हॉल बांधणे या कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम रू.33,81,000/- या रक्कमेस मान्यता घेणे बाबत तसेच सदर कामाचे ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी. क्र.2017-AMCA-244971-1 सन 2017-2018

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | कार्यकारी अभियंता-1 कार्यालय. |
| 2. | कामाचे स्वरुप | वॉर्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत चैतन्य हौसींग सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिंटन हॉल बांधणे. |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | 33,81,000/- |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 32,19,785/- |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा-ई-टेंडर |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत (एकूण 4 वेळा) (4 वेळा मुदतवाढ) | 21/09/2017 ते 13/10/2017 |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 17/10/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | एक |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| अ.क्र. | ठेक्दाराचे नांव व पत्ता | टेंडर रक्कम रुपये | पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त |
|---|---|---|---|
| 1 | मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट | 3219785.00 | 10.00 टक्के जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | मंजुर रेखाकंनातील विकास कामे |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे काय? | होय |

तरी विषयाकिंत प्रकरणी ठेकेदार मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.78 विद्यानगर अंतर्गत चैतन्य हौसींग सोसायटी येथील मनपाच्या खुल्या जागेत नविन बॅडमिन्टन हॉल बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदाधारक मे.शंकर पार्वती मल्टी प्रोजेक्ट यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 32,19,785/- पर्यंत काम करून घेणेस तसेच स्टार रेट नुसार दरातील फरक काढून देयक अदा करणे व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. 187 :</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेने-

1. महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेवर / इमारतीवर जाहीरात फलक उभारणे.
2. नव्याने विकसीत झालेल्या भागात दिशा दर्शक कमानी (गॅन्ट्रीज) उभारणे.
3. महानगरपालिकेच्या शहर बस सेवेसाठी बस स्टॉप उभारणे.
4. उड्डाणपुला खालील जागा / आय लॅण्ड विकसीत करणे.
5. दुकानावरील नामफलका व्यतिरिक्त लागणारे व्यवसायीक जाहीरात फलक, बोर्ड, कि-ऑस्कद्वारे लागणाऱ्या जाहीराती व इतर जाहिरातींचा कर वसुली करणे.

वरील 05 प्रकारासाठी जाहीर प्रगटनाद्वारे प्रस्ताव मागविण्यात आले असता त्यापैकी केवळ क्रमांक 1 आणि 5 या दोन प्रकारांमध्ये परिपूर्ण प्रस्ताव प्राप्त झालेले होते. महानगरपालिकेच्या जागेवर इमारतीवर जाहिरात फलक उभारणीमध्ये योग्य असे मे.ड्रीम्स क्रिएशन ॲडव्हर्टायझींग आणि मे.फ्युचर मिडीया ॲडव्हर्टायझींग यांना विभागून दिले आहे. यातुन एकुण रू.17,00,000/- (रू.सतरा लक्ष फक्त) वार्षिक उत्पन्न प्राप्त होईल. सोबतच युनीपोलवर दिशादर्शक असल्याने जनतेस त्याचा लाभ होईल व महानगरपालिकेचा खर्चही वाचेल.

त्याप्रमाणे प्रकार 5 मध्ये दुकानावरील नामफलका व्यतिरिक्त लागणाऱ्या व्यावसायिक जाहिरात फलक, बोर्ड, कि-ऑस्कद्वारे लागणाऱ्या जाहिराती व इतर जाहिरातींचा कर वसुली करणे मध्ये मे.फ्युचर मिडिया ॲडव्हर्टायझींग यांचा प्रस्ताव सर्वात जास्त दराचा होता. सदर प्रस्तावानुसार महानगरपालिकेला र.रू.8,00,000/- (रू.आठ लक्ष फक्त) वार्षिक उत्पन्न मिळणार आहे.

यासाठी नियुक्त केलेल्या समितीतील सदस्य (मुख्यलेखाधिकारी, कार्यकारी अभियंता-1,2,3 व 8, विधी सल्लागार, उद्यान अधिक्षक, कार्यकारी अभियंता 4,5,6,7 व 9 आणि मालमत्ता अधिकारी) समितीने प्राप्त प्रस्ताव छाननी करून शिफारस केल्यानुसार मान्यतेस्तव दिनांक 19/09/2017 रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेपूढे प्रस्ताव सादर करण्यात आला.

सर्वसाधारण सभेने क्रमांक-1 साठी मे.ड्रिम्स क्रिएशन ॲडव्हर्टायझींग आणि मे.फ्युचर मिडिया ॲडव्हर्टायझींग यांना विभागून तीस वर्षासाठी तसेच क्रमांक-5 साठी मे.फ्युचर मिडिया ॲडव्हर्टायझींग यांचा प्रस्ताव महानगरपालिकेच्या हिताचा असल्याने त्यांना तीस वर्षासाठी त्यांच्याकडून करून घेण्यास ठराव क्रमांक 1291 दिनांक 19/09/2017 अन्वये मान्यता दिलेली आहे.

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 मधील तरतुदीस अनुसरून प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.राजगौरव वानखेडे : पुर्ण शहरामध्ये होर्डीगच्या संदर्भामध्ये एक टेंडर काढलेले आहे. हे कधी मंजुर झाले आहे, याची कोणत्याही सदस्याला कल्पना नाही. याच्यामध्ये करोडो रुपयाचे नुकसान मनपाचे होणार आहे. होर्डीगच्या संदर्भामध्ये एकुण किती उत्पन्न आपल्याकडे आलेले आहे?

मालमत्ता अधिकारी : या संदर्भात पाच category मध्ये जाहीर निविदा प्रस्ताव मागविण्यात आले होते. महापालिकेच्या जागेवर सध्या शुन्य उत्पन्न आहे. होर्डीग हे खाजगी इमारतीवर असतात.

श्री.रेणुकादास वैद्य : ज्या जागा मनपाला देणार आहोत त्या किती आहेत? कोणत्या आहेत? याबाबत माहिती द्यावी.

मालमत्ता अधिकारी : सध्या सांगता येणार नाही. या संदर्भात एका single पोल वर 8/10 चे फलक उभे राहणार आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : मा.सभापती साहेब याच्यामध्ये कशा-कशाचा समावेश आहे? ह्या जागा किती आहेत, कुठल्या आहेत, किती बाय कितीची आहे? या सगळया बाबीचा विचार झाला पाहिजे. आणि याची एकत्रीत निविदा काढली पाहिजे.

मालमत्ता अधिकारी : याच्यामध्ये तीन प्रस्ताव मंजुर झालेले आहेत. उड्डाणपुला खालील प्रस्ताव आलेले नाहीत. आणि गॅन्ट्रीजसाठी प्रस्ताव आलेले नाहीत.

श्री.रेणुकादास वैद्य : तुम्ही एकत्रित सगळ्या जागेचा विचार करुन याची पुर्ननिविदा करावी. याच्यामध्ये करोडो रुपये महापालिकेला मिळतील.

श्री.राजगौरव वानखेडे : मागच्या बैठकीत सुध्दा मी विचारले होते की, होर्डीगच्या संदर्भामध्ये किती महसुल महानगरपालिकेत जमा होतो. त्याची माहिती सुध्दा आता पर्यंत दिलेली नाही. पुर्ण शहरामध्ये किती होर्डीग आहेत? त्यांना काय रेट लावतो आहे? त्याच्या टेंडरला अधिकार आहे का नाही? वसुली किती करतो आहे? या सदर्भात कोणतेच धोरण आता पर्यंत महानगरपालिकेने केलेले नाही.

श्री.रेणुकादास वैद्य : याच्या मध्ये कुठेही पारदर्शकता नाही. मोघम सगळ्या गोष्टी लिहिलेल्या आहेत. सतरा लाख रुपयात पुर्ण महापालिका क्षेत्रातील मनपाच्या जागेचा अधिकार आपण विकतो आहे असा त्याचा अर्थ होतो.

मालमत्ता अधिकारी : युणीक पोल पन्नास ठिकाणी आहे तर होर्डींग दहा ठिकाणी आहेत. महापालिकेचे दिशा दर्शक फलक लागतील. महापालिकेचे जाहिराती असतील ते मोफतमध्ये करण्यात येईल.

श्री.रेणुकादास वैद्य : महापालिकेच्या महसुलाचे खुप मोठे नुकसान आहे. याची पुर्ण निविदा आठ पंधरा दिवसात तातडीने मांगवावी. महापालिकेचा महसुल वाढला पाहिजे. त्याच्यासाठी कोणत्याही स.नगरसेवकाचा विरोध नसला पाहिजे. आम्ही फक्त प्रयत्न करतो आहे की, ह्या सतरा लाखा पेक्षा निश्चित पणे जास्त आहे.

श्री.राजगौरव वानखेडे : जे धोरण ठरऊ ते समिती समोर आणावे. त्याच्यामध्ये मंजुरी मिळुन नंतर ते टेंडर काढावे.

श्रीमती किर्ती शिंदे : प्रत्येक वर्षी या विषयाची निविदा निघली पाहिजे. आणि ती रिकॉल करावी.

श्री.सय्यद मतीन : होर्डींगच्या परमिशनच्या नावावर शंभर शंभर होर्डींग लावलेली आहे. त्याची चौकशी करावी. आपल्या शहरामध्ये video shooting करावी की, कुठे कुठे होर्डींग लावलेले आहेत.

श्री.सिध्दांत शिरसाट : शहरातील होर्डींगचा विषय चालू आहे. त्या संदर्भात महानगरपालिकेमध्ये किती होर्डींगची नोंद आहे. खाजगी इमारतीवर होर्डींग लावलेले आहेत. ते बिल्डींग मालक त्याचा दर किती घेतो? त्या बिल्डींगस ला कमर्शियल टॅक्स लावायला पाहिजे. आपण फक्त घराचा टॅक्स लावतो. काही अशा पण होर्डींग आहेत ज्या पडायला आलेल्या आहेत.

मा.सभापती : संबंधीत सदस्यांनी ज्या सुचना केल्या आहेत, या विषयाबाबत 15 दिवसाच्या आत पुर्ननिविदा त्वरित काढण्यात यावी. सध्या हा विषय रद्द करण्यात आला आहे. याबाबत त्वरित निर्णय घेऊ. नियमा नुसार किती लोकांची परवानगी घेऊन होर्डींग उभे केले त्याची माहिती घ्या आणि त्याच बरोबर धोकादायक होर्डींग्ज कुठे कुठे आहेत आणि ज्या बिल्डींगला कमर्शियल टॅक्स लावलेला नाहीत, त्यांनी फक्त होर्डींग लावलेले आहेत त्यांना कमर्शियल टॅक्स लावण्यात यावा.

श्री.सय्यद मतीन : औरंगाबाद शहरामध्ये किती होर्डींग आहेत? याबाबतीत ठोस निर्णय घ्यावा. स्थायी समितीचे काही सदस्य सोबत घ्या आणि पुर्ण शहरामध्ये होर्डींगची video shotting करा असे आदेशित करण्यात यावे.

मा.सभापती : स.सदस्य मतीनजी यांनी काही सुचना केली त्यानुसार स्थायी समितीचे चार सदस्य घेऊन त्या ठिकाणाची पाहणी करावी. आणि ही माहिती 15 दिवसाच्या आत सभागृहासमोर आणावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : जे लाईटचे पोल आहे त्याच्यावर 2/3 ची frame लावण्याची जी पध्दत चालु केलेली आहे. ती कशी काय चालु केली?

मा.सभापती : डिवायडर जे साफ सफाई ठेवतात त्यांना पोल साफ ठेवणे, आणि त्याची जाहीरात त्यांनी करणे. अशा प्रकाराचा तो विषय होता. तरीपण आपले काय म्हणणे आहे?

श्री.सिध्दांत शिरसाट : जे होर्डींग लावलेले आहेत तर त्याच्या पेक्षा एकच मोठी जाहीरात द्यावी. प्रत्येक चौकामध्ये एक होर्डींग आहे. तुम्ही एकच होर्डींगची जाहीरात द्यावी. पोलवर जे छोटे छोटे frame लावलेले आहेत ते काढण्यात यावे.

मा.सभापती : मागच्या मा.महापौर यांच्या बैठकीमध्ये पण हा विषय होता. जेवढे डिवायडर आहेत त्याची देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी ज्या एजन्सी दिल्या आहेत त्यांना तो अधिकार मा.महापौर यांनी दिलेला आहे. याची दखल घेण्यात येईल.

श्रीमती.राखी देसरडा : तीन नं. चा जो मुद्दा आहे बस स्टॉप उभारण्या बाबतचा, अगोदरचे जे बस स्टॉप आहेत त्यांची अवस्था खुप वाईट झाली आहे. ते आधी सुधारले पाहिजेत. नंतर नवीन बस स्टॉप उभारण्यात यावे.

मा.सभापती : याबाबत संबंधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

कार्यकारी अभियंता : जे बसस्टॉप खराब झालेले आहेत आणि जे बसस्टॉप नवीन करायचे आहेत ते सगळे बस स्टॉप स्मार्ट सिटी मध्ये करणार आहोत.

मा.सभापती : या विषयासंबंधी 15 दिवसाच्या आत त्वरित निविदा करण्यात यावी. आणि ज्या सुचना केल्या आहेत त्याची दखल घ्यावी.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्तावासंबंधी स.सदस्यांनी ज्या सुचना केल्या आहेत, या विषयाबाबत 15 दिवसाच्या आत पुर्ननिविदा त्वरित काढण्यात यावी. सध्या हा विषय रद्द करण्यात येत आहे. याबाबत त्वरित निर्णय घेऊन नियमानुसार किती लोकांची परवानगी घेऊन होर्डींग उभे केले त्याची माहिती घ्या आणि त्याच बरोबर धोकादायक होर्डींग्ज कुठे कुठे आहेत आणि ज्या बिल्डींगला कमर्शियल टॅक्स लावलेला नाहीत, त्यांनी फक्त होर्डींग लावलेले आहेत त्यांना कमर्शियल टॅक्स लावण्यात यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 188 :**

विषय : वार्ड क्र.13 भिमनगर, भावसिंगपुरा, निसर्ग कॉलनी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरीक दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजने अंतर्गत कामे करणे.या कामाचे ठेकेदार श्री.व्ही.आर.महाजन यांचेकडून 30% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 43425182.94/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर क्र.2017-AMCA-244903-1

| | | |
|---|---|---|
| 1. | खात्याचे नांव | अभियंता झोन क्र.-06 |
| 2. | कामाचे स्वरुप | पाणी पुरवठा व स्वच्छता |
| 3. | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | 33403987.00 |
| 4. | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नावे व प्रसिध्दीचा दिनांक | महा इ सेल विभागामार्फत प्रसिध्दी |
| 5. | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत (एकूण 4 वेळा) (4 वेळा मुदतवाढ) | --- |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | 25/10/2017 |
| 6. | एकुण किती टेंडर्स आली? | 03 |

**(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)**

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नांव व पत्ता** | **टेंडर रक्कम रुपये** | **पूर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| 1 | श्री.व्ही.आर. महाजन | 44021778.15 | 31.79% जास्त दराने |
| 2 | श्री.पी.पी.जोशी | 46682071.67 | 39.75% जास्त दराने |
| 3 | मे.जीएसआर कन्स्ट्रक्शन | 47767701.24 | 43.00% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| 7. | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |

| | | |
|---|---|---|
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | --- |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | --- |
| 8. | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमूद करावे. | महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरी दलित वस्ती पाणीपुरवठा व स्वच्छता योजना. |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतूद उपलब्ध आहे काय? | होय |
| 9. | सदरचे काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | नाही |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| 10. | सोबत मान्य पूर्वगणकपत्रकाच्या विषयपत्राचा नमुना जोडला आहे काय? | --- |

तरी विषयांकित काम ठेकेदार श्री.व्ही.आर.महाजन यांचेकडून 31.79% जास्त दराने निविदा भरली होती. तथापी मा.आयुक्त महोदय, यांचे दालनात झालेल्या चर्चेनुसार ठेकेदारांनी 31.79% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30% जास्त दराने काम करण्यास संमती दिली आहे. करीता म्हणजेच टेंडर अटी शर्तीतील भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

मा.सभापती : विषय क्र.188 मंजुर करण्यांत येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.13 भिमनगर, भावसिंगपुरा, निसर्ग कॉलनी महाराष्ट्र सुवर्ण महोत्सवी नागरीक दलित वस्ती पाणी पुरवठा व स्वच्छता योजने अंतर्गत कामे करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा 31.79% जास्त दराचे निविदाधारक श्री.व्ही.आर.महाजन यांचेशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार त्यांचेकडून 31.79% जास्त दरा ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 30% जास्त दराने म्हणजेच टेंडर रक्कम रूपये 43425182.94/- पर्यंत करून घेणेस अधिक टेंडर अटी/शर्तीतील भाववाढ व विशेष भाववाढ सुत्रानुसार फरक अदा करणेस/कपात करणेस व करार करणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>चर्चा :</u>

श्री.रेणुकादास वैद्य : या शहरामध्ये म.न.पा. च्या असंख्य खुल्या जागा आहेत. गजानननगर, क्रांती चौक भागात महानगरपालिकेची खुली जागा CTS नं. 16029/11 sheet नं. 151 या जागेसाठी 2005 ते 2010 या पाच वर्षात आणि त्या नंतर पुन्हा 2010 ते 2015 अशा दहा वर्षामध्ये साधारण 22 पत्र प्रशासनाला दिले आहे. 2015 पासुन ते 2017 पर्यंत त्या वॉर्डाच्या नगरसेविका श्रीमती.शिल्पाताई वाडकर यांनी साधारणतः 25 पत्र दिलेले आहेत.या जागेचा निकाल कोर्टामध्ये महानगरपालिकेच्या बाजुने लागला. कोर्टाने आपल्या बाजुने निर्णय दिल्या नंतर या जागेवर महापालिकेचे नाव का लागत नाही?

मा.सभापती : अनेक ठिकाणी महानगरपालिकेच्या खुल्या जागा पडलेल्या आहेत. त्याच्यावर कोणाचे लक्ष नाही. मा.महापौर साहेबांनी सुध्दा GB च्या बैठकीत याबाबत सुचना केली. अशा सर्व जागेचा सर्व्हे करावा. आणि योग्य त्या ठिकाणी बोर्ड लावण्यात यावे किंवा compound wall व झाडे लावुन सर्व जागा ताब्यात घेण्यात याव्यात. ज्या ठिकाणी हस्तांतर झालेल्या जागा आहेत परंतु महानगरपालिकेचे नाव लागलेले नसेल याची सुध्दा दखल घ्यावी.

श्री.अजिम अहेमद : स.नगरसेविका श्रीमती.शेख नरगीस यांच्या वॉर्डात एक open space CTS No. 11315 आहे. त्याचा पाठपुरावा केलेला नाही. याबाबत श्री.कांबळे यांना पुर्ण कागदपत्रे दिलेले आहेत. त्याबाबत अद्याप कार्यवाही केलेली नाही. ती जागा आज पण तीन लोकांच्या नावावर आहे.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : कट-कट गेट येथील open space जागेवर अतिक्रमण होत आहे. ही बाब वेळोवेळी लक्षात आणुन दिली असुन सुध्दा काही केलेले नाही. याबाबत खुलासा द्यावा? |
| मालमत्ता अधिकारी | : CTS No.11315 ही जागा महानगरपालिकेच्या नावावर करुन घेण्यात आलेली आहे. |
| मा. सभापती | : त्याची पुर्णपणे पाहणी करावी आणि मनपाचा बोर्ड लावण्यात यावा. कोणी अडथळा निर्माण करत असेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. |
| श्री.सिताराम सुरे | : नोव्हेंबर 2016 पासुन जळगाव रोड ते पिसादेवी रोडच्या संदर्भात अनेक वेळा स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मी प्रश्न उपस्थित केला आहे. अधिकाऱ्यांनी उत्तर दिले आहे की, ती जागा आपल्या ताब्यात नाही. तेथील एका शेतक-यानी जवळपास दहा हजार लोकांचा रस्ता अडवलेला आहे. आदेश करुन सुध्दा संबंधीत अधिकाऱ्यांनी त्या जागेचे अतिक्रमण काढण्यासंदर्भात कुठलीही भुमिका हाती घेतलेली नाही. |
| मा.सभापती | : मागच्या बैठकीला श्री.काझी साहेबांनी याबाबत कार्यवाही करण्याची माहिती दिली होती. वॉर्ड अधिकारी यांनी याबाबत खुलासा करावा. |
| वॉर्ड अधिकारी | : याबाबतची माहिती घेऊन कार्यवाही करण्यात येईल. आठ दिवसा पूर्वीचे चार्ज माझ्याकडे देण्यात आला आहे. हा भाग माझ्याकडे नव्हता. |
| श्री.सिताराम सुरे | : मा.खासदार श्री.खैरे साहेबांनी त्या रस्त्याचे उद्घाटन सात ऑक्टोंबर रोजी केलेले आहे. मा.महापौरांना याबाबतची पुर्ण माहिती आहे. अनेकवेळा त्यांना पत्र व्यवहार केलेला आहे संबंधीत अधिकारी म्हणतात, या संदर्भात माहित नाही. मा.सभापती महोदय या शहरातले बाराशे-तेराशे डी.पी रस्ते आहेत. अशा प्रत्येक रस्त्यांवर अतिक्रमण झालेले नाही. विधी सल्लागार यांनी सुध्दा या संदर्भात खुलासा केलेला आहे. सहा.संचालक न.र. यांनी सुध्दा खुलासा केलेला आहे. उपआयुक्त यांना याची पूर्ण माहिती आहे. त्यांनी एक वर्षापुर्वी भुमिका घेतली होती की, तो रस्ता आपल्या नावावर नाही. नावावर झाल्यापासुन काय केले आहे? त्या जागेचा 7/12 सुध्दा आहे. याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी. |
| मा.सभापती | : प्रशासनास आदेशित करण्यात येते की, श्री.अभंग यांना सदरील ठिकाणी पाहणी करुन त्वरित त्या ठिकाणाचा खुलासा करण्यात यावा. |
| श्रीमती संगिता वाघुले | : आरतीनगर, मिसारवाडी भागातील जो नाला आहे, मागच्या वेळेस लोकांच्या घरामध्ये पाणी गेले होते. अतिक्रमण संदर्भात माझे पाच ते सहा वेळेस बोलणे झालेले आहे. लोकांच्या घरात पाणी जाण्यापूर्वी ते अतिक्रमण काढले पाहिजे? काझी साहेबांनी याबाबत पाहणी सुध्दा केलेली आहे. |
| मा.सभापती | : मागच्या बैठकीत पण हा प्रश्न उपस्थित झाला होता. याबाबतची पाहणी करावी आणि त्वरित कार्यवाही करण्यात यावी. आणि 16 नं. वॉर्डातील बायजीपुऱ्यातील ड्रेनेज लाईन टाकण्यात जो problem येत आहे, ते पण काम त्वरीत पुर्ण करावे. |
| श्रीमती.मनिषा मुंडे | : माझ्या वॉर्डातील जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना खुप त्रास होत आहे. नाल्यावरील ड्रेनेज लाईन जशी मार्किंग केलेली आहे तशीच टाकण्यात यावी. |
| मा.सभापती | : श्री.अफसर सिद्दिकी यांनी पुर्ण टीम बरोबर घ्यावी, जे-जे अधिकारी पाहिजे असेल त्यांना सोबत घ्यावे आणि ते काम त्वरित करावे. |
| श्री.सय्यद मतीन | : शहरामधल्या दमडी महल येथील ब्रीजच्या रस्त्याचे काम चालु आहे. तो रस्ता जालना रोड पासुन collector office ला जुडत आहे. 15 दिवसापासुन एका श्रीराम पवार नावाच्या व्यक्तीचे घर मध्ये येत आहे. तर त्याला का काढण्यात येत नाही? महानगरपालिकेची अशी कोणती मजबुरी आहे? की ते काढत नाहीत? |
| मा.सभापती | : स.प्रभारी आयुक्त यांच्याशी या विषया संदर्भात बोलणे झाले आहे. याची त्यांनी दखल घेतलेली आहे. |
| वॉर्ड अधिकारी | : या ठिकाणचे अतिक्रमण काढण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. परंतु मा.महापौर साहेबांच्या सुचना होत्या. याबाबत मा.खासदार साहेबांनी पाहणी करुन त्यांना चार दिवसाची मुदत दिली होती. |

मा.सभापती : मा.जिल्हाधिकारी साहेबांनी आदेशित केले होते, नंतर ते सभागृहात सुध्दा बोलले होते. मा.महापौर सुध्दा बोलले होते. हा विषय पुन्हा पुन्हा काढु नका.

श्री.सय्यद मतीन : आता पर्यंत का तोडले नाही? अशी कोणती मजबुरी होती?

वॉर्ड अधिकारी : तेथे तीन परिवार राहतात. आम्हाला तीन चार दिवसाची मुदत द्या असे ते म्हणाले होते.

श्री.सय्यद मतीन : मुदत देऊन आठ दिवस झाले आहे. त्यालाच आता 15 दिवस झाले आहेत?

मा.सभापती : त्वरित त्याच्यावर बुधवार पर्यंत कारवाई नाही केली,तर त्यांच्यावर आपण कारवाई करु.

श्रीमती स्वाती नागरे : मागच्या मिटींग पासुन सांगत येत आहोत की, भाजी-मंडी जवळचे अतिक्रमण काढा. ते अजुन पण काढलेले नाही. आणि स्मशान भुमि जवळ जे वाळु-खडीचे टॅक्टर उभे असतात. अंत्यविधीसाठी तेथे खुप त्रास होत असतो. त्याच्याकडे पण लक्ष देण्यात यावे.

मा.सभापती : श्री.राजु वैद्य आणि श्रीमती नागरे ताई यांच्या भागात जे अतिक्रमण होत आहे, त्याची दखल घ्यावी. त्वरित कार्यवाही करावी. तेथे कायम स्वरुपी सेक्युरिटी देण्यात यावेत.

श्री.सिध्दांत शिरसाट : मागच्या बैठकीत रेल्वे स्टेशन जवळील पेट्रोल पंपाचा विषय उचलला होता, त्याच्यावर काय कारवाई केली? याचा खुलासा द्यावा.

कनिष्ठ अभियंता(श्री.कुलकर्णी): या विषयी माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही.

श्री.सिध्दांत शिरसाट : माझ्या वॉर्डातील असलेला डीपी रोडचा विषय होता. आज पर्यंत हा रस्ता का मोकळा करण्यात आलेला नाही?

मा.सभापती :मंगळवारच्या बैठकीत श्री.ए.बी.देशमुख या ठिकाणी राहतील तेव्हा हा विषय घेण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : रेल्वे स्टेशन भाजी-मंडीचा जो रस्ता आहे, तेथील मनपाची जुनी बिल्डींग धोकादायक आहे. तेथे काही दुर्घटना घडली तर जबाबदार कोण राहणार आहे?

मा.सभापती : स.सदस्य आपले तिन्ही विषय टाऊन प्लॅनीगच्या निघडीत आहे. संबंधीत अधिकारी आज नसल्यामुळे मंगळवारी माझ्या कॉबिनमध्ये या विषया संदर्भात चर्चा करण्यात येईल.

श्री.सिध्दांत शिरसाट : मी जे अतिक्रमण काढायला लावले होते. मस्जिदच्या समोर लागत ज्या तीन चार दुकाने रस्त्यावर आलेले आहेत. ते दुकाने compound च्या आतमध्ये टाकण्यात यावे. ते दुकाने अजुन का काढण्यात आले नाही?

श्री.सय्यद मतीन : त्या दुकानांवर स्टे मिळालेला आहे की, ते दुकाने मस्जिदच्या आहेत.

श्री.रेणुकादास वैद्य : श्री.सिध्दांत शिरसाट अनेक दिवसांपासुन रेल्वेस्टेशनचा श्वास मोकळा करण्याचा प्रयत्न करत आहेत. कुठलीही कार्यवाही आपल्या विभागाकडुन होत नाही. आठ दिवस सलग ते अतिक्रमण काढण्यात यावे. प्रश्न कुठलाही असला तरी हा आपल्या शहरातला आहे. याचा विचार केला पाहिजे. शहरातले कुठलेही अतिक्रमण ठेऊ नका. ही विनंती आहे.

श्रीमती मनिषा मुंडे : रेल्वे स्टेशन रोडवरील शिवाजी पुतळयाजवळ संध्याकाळी रेल्वे आल्यावर लोकांना चालता येत नाही, येवढ्या भाजीच्या गाड्या तेथे उभे असतात.

मा.सभापती : श्री.अभंग रस्त्यावर जे-जे हात गाड्या आल्या असतील त्याची पाहणी करुन घ्यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : या विभागात काम करण्यासाठी संबंधीत अधिकारी सक्षम आहेत का? कारण, बोलुन सुध्दा हे काहीच काम करत नाही.

श्री.सय्यद मतीन : सं.सदस्य जफर अख्तर वॉर्ड नं.60 यांच्या वॉर्डामधील जेथुन महानगरपालिकेची ड्रेनेज लाईन जात आहे. त्याच्यावर समोरच्याने टपरी टाकुन ठेवलेली आहे. यांनी येऊन बघीतले, पण ती टपरी काढली नाही.

मा.सभापती : संबंधीत सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे याबाबत गंभीर दखल घेण्यात यावी.

श्री.रेणुकादास वैद्य : गजानन नगर वॉर्डामधील लोकांनी open space जागा मंगल कार्यालयासाठी सोडलेली होती, पण आता तेथे दोन घरे बांधलेली आहेत.

मा.सभापती : ज्या-ज्या सुचना संबंधीत सदस्यांनी केल्या आहेत, त्याची प्रशासनाने दखल घ्यावी. आणि जी टपरी ड्रेनेज लाईनवर आहे, ती त्वरित काढण्यात यावी.

श्री.सिध्दांत शिरसाट : अतिक्रमण काढण्यासाठी हे पथक पोलीस पथकासहित येत असतात. पण यांना संबंधीत कोणत्या तरी अधिकारीचा किंवा लोक प्रतिनिधीचा फोन येतो, आणि हे पथकासहित परत

चालले जातात. यांना आदेशित करण्यात यावे की, योग्य ती कार्यवाही केल्या शिवाय त्यांनी परत जाऊ नये.

मा.सभापती : जे पण काम करु ते ठोस रितीने पुर्ण करण्यात यावे. ठोस कार्यवाही करण्यात यावी. अडथळा निर्माण होत असेल तर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा.

श्री.सिध्दांत शिरसाट : उघड्यावर जी मांस विक्री चालु आहे, त्याच्यावर काय कारवाई करण्यात येते? त्याचा खुलासा करण्यात यावा? रेल्वे स्टेशन येथील जुने मांस मार्केट आहे, ते उघडयावर न करता त्याला एक कव्हर करुन विक्री केली पाहिजे.

मा.सभापती : संबंधीत विभागाला आदेशित करण्यात येते की, त्या ठिकाणी उघड्यावर मांस विक्री होता कामा नये.

श्री.सिध्दांत शिरसाट : मांस विक्री कर्ता यांच्याकडे चार व्यक्ती बेकायदेशीर आहेत. आणि ते अतिक्रमण करुन रस्त्याच्या पुढे आलेले आहेत. ते अतिक्रमण सुध्दा तोडावे म्हणुन मी वारंवार सांगत आलेलो आहे. तिही कार्यवाही करण्यात नाही?

मा.सभापती : त्या ठिकाणाचे अतिक्रमण त्वरित काढण्यात यावे? आणि जे उघड्यावर मांस विक्री करत असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.संगिता वाघुले : सनी सेंटरच्या रस्त्यावरील जे मच्छी विक्रेते आहेत, ते सगळी घाण समोरच्याच रस्त्यावर आणुन टाकतात. तेथील नागरीकांना याचा खुप त्रास होत आहे. याच्यावर पण कार्यवाही करण्यात यावी.

मा.सभापती : मागच्या बैठकीत सुध्दा हा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता. याबाबतची दखल प्रशासनाने घ्यावी. पुर्ण शहरामध्ये जिथे पण उघड्यावर मांस विक्री होत असेल, त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.किर्ती शिंदे : मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार शौचालय बांधण्याबाबत प्रशासनाने अद्याप काय कार्यवाही केली? याबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : सुलभ शौचालय बाबतची माहिती सभागृहात द्यावी.

कार्यकारी अभियंता(ड्रेनेज) : याच्यामध्ये पाच ठिकाणी हे काम हाती घेतले आहे. दोन ठिकाणी शौचालयाचे काम चालु आहे. पण नियमित कंत्राटदार नसल्यामुळे पाच महिन्यापासुन त्याचे Bill painding आहेत.

श्रीमती किर्ती शिंदे : मार्च पर्यंत सदरील काम पुर्ण झाले नाही, तर मी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये याबाबत याचिका दाखल करणार आहे.

मा.सभापती : मार्च पर्यंत हे काम त्वरित पुर्ण करण्यात यावे.

श्रीमती किर्ती शिंदे : एस आय संदर्भामध्ये प्रशासनाने आता पर्यंत शासनाने कळवले व नाही कळवले याबाबत काय कार्यवाही आहे?

मा.सभापती :मागच्या बैठकीत पण हा विषय निघाला होता.त्याच्याबद्दल काय माहिती आहे ते स्पष्ट करा.

वॉर्ड अधिकारी : वर्ग चार चे कर्मचारी एस आय म्हणुन काम करत आहेत. याबाबत काल मा.सभापती साहेबांकडे बैठक झालेली आहे. एकुण दहा एस आय काम करणारे आहेत. याच्यामध्ये रिक्त पदे किती आहेत? याच्यामधुन किती पदे भरता येतील? आणि हे भरायचे असतील तर पदोन्नोतीने भरावे लागतील. याबाबतील लवकरच प्रशासन कार्यवाही करेल. आणि आयुक्तांकडे प्रस्ताव सादर करेल.

मा.सभापती : स.सदस्य श्रीमती.शिंदे ताई याबाबत कालच मी बैठक घेतलेली आहे. त्यानुसार निकष काढलेले आहे. त्यांना त्वरित कार्यवाही करण्यासाठी आदेशित केले आहे.

श्रीमती किर्ती शिंदे : माझ्या वॉर्डामध्ये तीन सफाई कर्मचारी कमी आहेत. ते पण देण्यात यावे.

मा.सभापती : यांच्या वॉर्डामधील माहिती वॉर्ड इंजिनियर कडुन घ्यावी.

श्रीमती किर्ती शिंदे : वॉर्ड अधिकारी कायम स्वरुपी नाही. त्याच्यामुळे त्यांना काही माहिती नाही की, कोणत्या वॉर्डात किती कर्मचारी आहेत?

मा.सभापती : यामध्ये प्रशासन कार्यवाही करत आहे. शासनाकडे त्यांचा पाठपुरवठा चालु आहे.

श्रीमती राखी देसरडा : जो कचऱ्याचा प्रश्न आहे, तो फक्त सभासदांचा नसुन तो सर्वच नगरसेवकांचा आहे. याच्यामध्ये सर्वांनाच कचऱ्यासाठी कर्मचारी पाहिजेत. 2015 ते 1 जुन 2017 पर्यंत अगोदर हा एलबीटी टॅक्स होता, आता तो नाही. ज्यांचे एका वर्षात 50 कोटी रुपयांपेक्षा जास्त टन वर आहे, त्यांचा टॅक्स आधी वसुल करावे. अशी सुचना महाराष्ट्र शासनाने दिली होती. आज पर्यंत तो टॅक्स किती वसुल केला आहे? याची माहिती द्यावी.

मा.सभापती : सं.सदस्य श्रीमती.देसरडा ताई यांनी कालच का प्रश्न उपस्थित केला होता. या गोष्टीचा पाठ पुरवठा चालु होता. त्या अनुषंगाने कालच श्री.जारवाल साहेबांशी सविस्तर बोलणे झाले होते. त्यांनी माहिती सभागृहात द्यावी असे आदेशित केले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : जी एस टी लागायच्या अगोदर पासुन एलबीटीचे जे 50 कोटी रुपयाचे Tax sanction वाल्या कंपन्या आहेत, त्याचे किती Registration झाले आहे? त्यांच्याकडुन किती टॅक्स वसुल झाला आहे?

मा.सभापती : महापालिकेचा हा अतिशय महत्वाचा भाग आहे. एलबीटीच्या अनुसरुन योग्य ती दखल घेणे जरुरी आहे. याबाबतची माहिती सभागृहात द्यावी.

स्था.सं.कर अधिकारी : 32 व्यापाऱ्यांकडुन 84,2386266/- रुपये वसुल केलेले आहे. काही करनिर्धारण करणे बाकी राहीले आहेत. यामध्ये 50 कोटी पेक्षा जास्त उलाढाल आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : ही संख्या 32 पेक्षा किती तरी जास्त आहेत. तुम्ही त्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केलेला नाही किंवा खालच्या अधिकाऱ्यांनी त्या लोकांना यादीत समाविष्ठ होण्यापासुन परावृत्त केलेले आहे, असा माझा स्पष्ट आरोप आहे.

स्था.सं.कर अधिकारी : याबाबत सविस्तर माहिती सध्या माझ्याकडे उपलब्ध नाही. सभागृहाला पुढील बैठकीमध्ये याबाबत सविस्तर माहिती सादर करण्यात येईल.

मा.सभापती : याबाबतीत दखल घेण्यात यावी. पुढच्या बैठकी पर्यंत सविस्तर माहिती देण्यात यावी. ही संख्या 32 पेक्षा जास्त असल्याची गंभीर नोद घ्यावी.

श्रीमती मनिषा मुंडे : माझ्या वॉर्डामध्ये तीन सफाई कर्मचारी महिला आहेत. 115 वॉर्डामध्ये बजत गटाचे असो किंवा महानगरपालिकेचे कर्मचारी असो, त्यांना सकाळी पाच वाजेपासुन घाण उचलण्यासाठी फिरावे लागते.

मा.सभापती : घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांनी याची दखल घ्यावी. त्यांना योग्य प्रकारे Mass, Hand gloss, शुज उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

श्रीमती संगिता वाघुले : आरती नगर, मिसरवाडी भागाला टॅक्स लावण्यात यावा.

वॉर्ड अधिकारी : श्री.महावीर पाटणीच्या वॉर्डामध्ये सध्या हे काम चालु आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : ही प्रक्रिया प्रत्येक वॉर्डामध्ये चालु झाली पाहिजे. महापालिकेचा महसुल वाढला पाहिजे या दृष्टिकोनातुन कार्यवाही झाली पाहिजे. आज लोक पैसे भरायला तयार आहेत, तर त्यांच्याकडे जे पण कागदपत्रे असतील त्याच्या अधारे जो टॅक्स लावता येईल तो लावण्यात यावा.

मा.सभापती : स.सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे याची दखल घेण्यात यावी.

वॉर्ड अधिकारी : पुढच्या आठवड्यामध्ये स.सदस्यांच्या वॉर्डात काम चालु होईल.

श्री.रेणुकादास वैद्य : अग्निशामक दलातील कर्मचारी तातडीने सेवा देण्यासाठी नेहमी कार्यरत असतात. त्यांना सुट्टीचा मोबदला देणे अपेक्षित होते. मागच्या 2010 आणि 2012 या दोन वर्षाचा त्यांचा सुट्टीचा मोबदला देण्यात आलेला नाही.

मा.सभापती : या विषया बाबत बैठक घेतली होती, मा.महापौर यांनी सुध्दा बैठक घेतली होती. त्याच्या मध्ये दिवाळीच्या वेळेस हा विषय निघाला होता. दिवाळी नंतर त्यांना कोणत्याही परिस्थितीत overtime चे पैसे देण्यात येईल, अशा प्रकाराची सुचना त्यावेळेस मा.महापौर यांनी दिली होती. संबंधीत विभागातील श्री.सोळुंके यांना माहिती दिली होती. पुन्हा याची दखल घ्यावी. त्वरित त्यांचा उतारा नियमानुसार करण्यात यावा.

| | |
|---|---|
| श्री.सय्यद मतीन | : समान पाणी देण्या संदर्भात चहल साहेबांनी 15 दिवसाचा वेळ सभागृहा समोर दिला होता. पण अजुन old city मध्ये 6-7 दिवसाला पाणी येत आहे. |
| मा.सभापती | : मागच्या तीन बैठकीपासुन पाण्याच्या विषया संदर्भात सांगण्यात येत आहे. त्याचे योग्य प्रकारे नियोजन का केले नाही? |
| उप अभियंता(पा.पु) | : old city मध्ये तीन दिवसा आड पाणी येणे सुरु केले आहे. |
| श्री.सय्यद मतीन | : तीन दिवसा आड पाणी येत नाही. सहाव्या दिवशी पाणी येत आहे. Old city मध्ये मुस्लिम बांधवांवर अन्याय करत आहेत. |
| मा.सभापती | : दोन महिन्यापासुन स.सदस्य सांगत आहेत, याबाबत नियोजन करण्यासाठी. पुन्हा एकदा आपल्याला संधी देण्यात येत आहे.याबाबत प्रशासनाने दखल घ्यावी.याचा 15 दिवसाच्या आत योग्य ते नियोजन करावे. आणि सगळ्यांना समान पाणी पुरवठा करण्यात यावा. |
| श्री.ऋषिकेश खैरे | :कित्येक महिन्यापासुन मी सुचना करत आहे. अधिकारी आजारी आहे, जो लाईनमन आहे तो पण आजारी आहे. आज माझ्या तीन्ही लोकांनी व्हॉल्ह सोडले, असे का होत आहे? जे आऊट सोर्सिंग वाले आहेत ते म्हणत आहे की, माझ्या घराचे काम चालु आहे. |
| मा.सभापती | : याबाबत खुलासा करण्यात यावा. |
| उप अभियंता(पा.पु) | : आयुक्त साहेबांची संचिकेत मान्यता घेण्यात आली आहे. |
| मा.सभापती | : त्वरित काम करण्यात यावे. आणि त्या व्यक्तीला सुध्दा कामाला घेण्यात यावे. |
| श्री.अजीम अहेमद | : दिल्ली गेट रोजाबाग येथील टाकी कधी साफ करण्यात आली आहे?- |
| मा.सभापती | : याबाबत माहिती द्यावी. |
| उप अभियंता(पा.पु) | : टाकी साफ करुन पाच महिने झाले आहे. |
| मा.सभापती | : याची दखल घ्यावी. आणि कोणाला तरी पाठवुन त्याची पाहणी करावी. |
| श्री.सय्यद मतीन | : महानगरपालिकेमध्ये लेखाधिकारी श्री.दुर्राणी 31-12-2017 तारखेला यांची निवृत्ती होणार आहे. त्यांच्या जागी एखाद्या अधिकाऱ्याचा प्रस्ताव पाठवण्यात यावा. |
| मा.सभापती | : जे-जे अधिकारी किंवा कर्मचारी निवृत्त झाले आहेत, त्यांच्या जागेवर नवीन अधिकारी किंवा कर्मचारी घेण्याच्या दृष्टिने प्रस्ताव तयार करावा. |
| श्रीमती.संगिता वाघुले | : आरती नगर, मिसरवाडी भागात दोन शिक्षिका दोन वर्षापासुन बालवाडी चालवत आहेत. अजुन पण त्यांना त्यांचे मानधन मिळालेले नाही. |
| उप आयुक्त(प्र.) | : महानगरपालिकेच्या वतीने तिथे एक बालवाडी शिक्षिका देण्यात आली आहे. परंतु तेथे विद्यार्थ्यांची संख्या जास्त नसल्यामुळे दोन बालवाडी शिक्षिका विना वेतन काम करत आहेत. परंतु असा निर्णय घेणे योग्य नाही. बालवाडी शिक्षिका भरण्यासाठी interview घेण्यात येतील. |
| मा.सभापती | : जे काही असेल ते नियमात बसुन करता येईल ते करावे. कारण दोन वर्षापासुन त्यांच्याकडुन आपण काम करुन घेत आहोत. प्रशासनाने याची दखल घ्यावी.<br>आणि नगर सचिव विभागासाठी नवीन दोन स्टेनोग्राफर आलेले आहेत. त्या पैकी एकाची ऑर्डर आली आहे. पण एकाची आलेली नाही. तरी त्यांची लवकरात लवकर ऑर्डर काढण्यात यावी. |
| श्री.ऋषिकेश खैरे | : माझ्या वॉर्डातील स्मशानभुमिचा प्रश्न आहे. दोन-तीन वर्षापासुन त्याचा पाठ पुरवठा मी करत आहे. ते टेंडर ला आहे की नाही, त्याची मान्यता झाली आहे की नाही? |
| मा.सभापती | : याबाबतची माहिती लवकरात लवकर घेण्यात यावी. |

याच बरोबर राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद